# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.03.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

**-** भारतीय वंशाच्या सुनिता विल्यम्स पृथ्वीवर दाखल, पंतप्रधानांचं सुनिता विल्यम्स यांना भारत भेटीचं आमंत्रण
- युक्रेनमधील उर्जास्त्रोत असलेल्या क्षेत्रात पुढील 30 दिवस युध्दविराम करण्याबाबत सहमती
- रशिया-युक्रेन संघर्षात अण्वस्त्र न वापराण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मध्यस्थी महत्वपूर्ण ठरल्याचे पोलंडच्या परराष्ट्र सचिवांचे गौरवोद्गार
- नागपूर हिंसाचार प्रकरणी दोषींवर कडक कारवाईचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा

आणि

- कबड्डी विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघाचा दणदणीत विजय

**सुनीता विल्यम्स**

गेले नऊ महिने अंतराळ स्थानकात अडकून पडलेल्या भारतीय वंशाच्या नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर आज पहाटे स्पेसएक्स क्रू ड्रॅगन स्पेसक्राफ्टमधून पृथ्वीवर परतले आहेत. त्यांचं स्पेसएक्स कॅप्सूल हे पॅराशूटच्या मदतीने मेक्सिकोच्या आखातात फ्लोरिडा पॅनहँडलमधील टालाहासीच्या किनाऱ्याजवळ उतरलं. यासोबतच आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक, अर्थात iss मधील नासाचे निक हेग आणि रशियन अंतराळवीर अलेक्झांडर गोर्बुनोव्ह हे अंतराळवीरही परतले आहेत. गेल्या जूनमध्ये केवळ 8 दिवसांच्या मोहिमेसाठी गेलेल्या दोन्ही अंतराळवीरांनी अंतराळात 286 दिवस आंतराळात घालवले. स्पेसेक्सच्या संपूर्ण गटाचं नासानं अभिनंदन केलं आहे. काल सकाळी त्यांचा पृथ्वीकडे परतीचा प्रवास सुरू झाला होता. त्यांना परत आणण्यासाठी गेलेलं ड्रॅगन हे यान काल सकाळी iss पासून वेगळं झालं. दरम्यान, पृथ्वीवर सुरक्षित परतल्यावर भारताला भेट देण्याचं आमंत्रण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुनीता विल्यम्स यांना दिलं आहे.

**ट्रंप-पुतीन**

युक्रेनमधील उर्जा पायाभूत सुविधा क्षेत्रात पुढील 30 दिवस युध्दविराम करण्याबाबत सहमती झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्यादरम्यान 90 मिनिटं दुरस्थ माध्यमातून काल चर्चा झाली. त्यांनतर ही माहिती देण्यात आली. दरम्यान उर्जा क्षेत्रातील युध्दबंदीसंदर्भात युक्रेननं अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.
मात्र रशियन राष्ट्राध्यक्ष संपूर्ण युक्रेनमधील युद्धबंदीला विरोध करत आहेत. अशी माहिती क्रेमलिननं दिली आहे. तीन वर्षांच्या संघर्षादरम्यान जप्त केलेल्या जमिनी आणि वीज प्रकल्पांबाबत पुतीन यांच्याशी चर्चा करणार असल्याची

अपेक्षा ट्रंप यांनी या संभाषणापुर्वी व्यक्त केली. गेल्या आठवड्यात सौदी अरेबियात परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या चर्चेदरम्यान युक्रेनियन अधिकाऱ्यांनी अमेरिकन प्रस्तावाला सहमती दर्शविल्यानंतर काल ही चर्चा झाली. दरम्यान, युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांना रशियन सैन्याची कारवाई लक्षात घेता शांतता कराराविषयी साशंकता व्यक्त केली आहे.

**पोलंड**

रशिया-युक्रेन संघर्षात अण्वस्त्रांचा वापर न करण्यासाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चर्चा करुन मध्यस्थाची महत्वाची भुमिका बाजवल्याचं पोलंडचे उप-परराष्ट्रमंत्री आणि परराष्ट्र सचिव व्लादिस्लाव तेओफिल बार्टोस्झेव्स्की यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं. बार्टोस्झेव्स्की यांनी पंतप्रधान मोदी यांच्या प्रयत्नांची प्रशंसा करत जागतिक शांतता प्रयत्नांमध्ये भारताची एक प्रमुख भूमिका अधोरेखित केली आहे.

**कुंभ मेळा मोदी**

प्रयागराज महाकुंभमेळा  हा जागृत राष्ट्राच्या भावनेचं प्रतिबिंब दर्शवणारा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं  पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. महाकुंभाचं  नेतृत्व हे संकल्पाने आणि अढळ भक्तीने प्रेरित झालेल्या लोकांनी केल्याचं मोदी यांनी महाकुंभावर निवेदन करताना काल लोकसभेत सांगितलं. महाकुंभादरम्यान गोळा केलेलं प्रयागराज इथल्या त्रिवेणी सांगमातील पवित्र जल पंतप्रधानांनी मॉरिशसच्या गंगा तलाव इथे अर्पण केलं तेव्हा निर्माण झालेल्या भक्ती आणि उत्सवाच्या वातावरणाचा मोदी यांनी यावेळी उल्लेख केला.

**सोनिया राज्यसभा**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा अर्थात मनरेगा अंतर्गत मजुरांना कायद्यानुसार किमान वेतनाची रक्कम आणि त्यांच्या कामाच्या दिवसांची संख्या वाढवण्याची मागणी खासदार सोनिया गांधी यांनी काल राज्यसभेत शून्य प्रहरात केली.  केंद्र सरकार मनरेगा पद्धतशीरपणे कमकुवत करत असल्याचा आरोपही गांधी यांनी यावेळी केला.

**एआय**

लोकसभेतील चर्चा आणि कामकाज सर्व भाषांमध्ये उपलब्ध होण्याच्या उद्देशानं कृत्रिम बुध्दीमत्ता अभियानाअंतर्गत काल एक सामंजस्य करार करण्यात आला. नवी दिल्ली इथे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत हा  करार झाला. या माध्यमातून एआय कोश नावाचा एक डेटा सेट तयार केला जाणार आहे. एआय कोशमुळे  लोकसभेतील व्यापक चर्चा आणि वादविवादांचं  कोणत्याही भाषेत  भाषांतर केलं जाणार आहे.

**विधि मंडळ फडणवीस**

नागपुरात सोमवारी, 17 तारखेला झालेला हिंसाचार पूर्वनियोजित असल्याचं प्रथमदर्शनी दिसत असून पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार असल्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत दिला. नागपुरात झालेल्या हिंसाचाराबद्दल मुख्यमंत्र्यांनी काल सभागृहात निवेदन दिलं. सर्व समुदायांचे सण-उत्सव

सध्या सुरू आहेत आणि अशा वेळी सर्वांनीच एकमेकांप्रति आदरभाव राखावा, शांतता राखत सण साजरे करावेत, असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं.
या प्रकरणी एकंदर पाच गुन्हे दाखल झाले असून नागपुरातल्या 11 पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली असून राज्य राखीव पोलीस दलाच्या पाच तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. कोणालाही कायदा आणि सुव्यवस्था हातात घेऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

**विधि मंडळ कामकाज**

महाराष्ट्रात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशींचा शोध घेण्यासाठी राज्य सरकारनं स्वतःहून एक मोहीम राबवली असून येत्या तीन महिन्यात अशा बांगलादेशींना स्थानबद्ध करण्यासाठी एक केंद्र निर्माण केलं जाईल, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी काल विधानसभेत दिली.  या संदर्भातल्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते.

**नेपाळ परराष्ट्रमंत्री**

नेपाळचे परराष्ट्रमंत्री डॉ. आरझू राणा देऊबा आणि भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्यात काल नवी दिल्ली इथे बैठक झाली. यावेळी उभय  नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला, विविध क्षेत्रांमध्ये सुरू असलेल्या सहकार्यावर आणि लोकांमधील संबंध आणि राजनैतिक देवाणघेवाण वाढवण्यावर चर्चा केली.
भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने आयोजित केलेल्या रायसीना संवाद 2025 च्या 10 व्या आवृत्तीच्या निमित्ताने ही भेट झाली. मंत्री डॉ. राणा यांनी या बैठकीला 'अत्यंत फलदायी संवाद' असं म्हटलं आहे.

**कीर्ती वर्धन-रायसीना संवाद**

भारताने 2070 पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्याचं  महत्त्वाकांक्षी उद्दीष्ट  ठेवलं असल्याचं परराष्ट्र राज्य मंत्री तसंच केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी काल अधोरेखित केलं. भारताच्या हवामान उपक्रमावरील रायसीना संवादात बोलताना सिंह यांनी 2030 पर्यंत अक्षय ऊर्जेपासून एकूण ऊर्जा क्षमतेच्या 50 टक्के लक्ष्य साध्य करण्यासाठी देश वचनबद्ध असल्याचं सांगितलं. भारत - हवामान बदल, पर्यावरण संरक्षण आणि हरित भविष्यासाठी अतिशय स्पष्ट उद्दिष्ट ठेवून पुढे जात आहे. राष्ट्रीय स्तरावर राबविण्यात आलेल्या अनेक उपक्रमांमुळे पॅरिस वचनबद्धता पूर्ण करणारा भारत हा पहिला G20 देश होता. अर्थव्यवस्थेत ऊर्जा कार्यक्षमता साध्य करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांमुळे 2005 ते 2020 दरम्यान भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या उत्सर्जन तीव्रतेत 36 टक्क्यांनी घट झाली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**निवडणूक आयोग**

मतदार ओळखपत्र आधारशी जोडण्याबाबत लवकरच तांत्रिक सल्लामसलत केली जाईल असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी गृह मंत्रालय, विधिमंडळ विभाग आणि UIDAI च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी नवी दिल्ली इथे  झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याचं एका निवेदनात म्हटलं आहे.

**शिवपुरी**

मध्य प्रदेशमधील शिवपुरी जिल्ह्यात माता टीला धरणात काल संध्याकाळी भाविकांना घेऊन जाणारी एक नाव उलटल्यानं झालेल्या अपघातात 7 जणांचा शोध अजूनही सुरु आहे. 8 जणांना वाचवण्यात राज्य राखीव पोलीस दलाला यश आलं असून या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री मोहन यादव यांनी तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. बचावकार्य अद्यापही सुरु आहे.  हे भाविक धरणातील बेटावर असलेल्या मंदिरात पुजेसाठी गेले होते. अशी प्राथमिक माहिती आहे.

**खेलो इंडिया**

युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी काल नवी दिल्ली इथे आगामी खेलो इंडिया पॅरा गेम्स-kipg 2025 च्या शुभंकर, बोधचिन्ह आणि गाण्याचं  अनावरण केलं. दिव्यांगांसाठीचे पॅरा गेम्स उद्यापासून 27 मार्चपर्यंत दिल्लीत होणार आहेत. खेलो इंडिया उपक्रमाने सहभागी होऊ शकणाऱ्या खेळाडूंना एक उल्लेखनीय व्यासपीठ दिल्यामुळे जागतिक स्तरावर देशाची प्रतिष्ठा उंचावली आहे.

**कबड्डी**

कबड्डी विश्वचषक स्पर्धेत गतविजेत्या भारतीय पुरुष संघाला काल रात्री इंग्लंडमधील वोल्व्हरहॅम्प्टन इथे झालेल्या सामन्यात स्कॉटलंडच्या संघाने 64-64 अशी बरोबरी साधत रोखलं. भारतीय संघाचा पुढचा सामना 19 मार्च रोजी हाँगकाँग चीनशी होईल. महिला गटात, भारतीय महिला संघाने त्यांच्या मोहिमेची सुरुवात सकारात्मक पद्धतीने करत ड गटाच्या पहिल्या सामन्यात वेल्सचा 89-18 असा दणदणीत पराभव केला. महिला गट ई सामन्यात इंग्लंडने हंगेरीचा 85-15 असा पराभव केला.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**